# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

## दि. २९ जानेवारी २०२० – डॉ. श्रीनन्द बापट

लोकमत

# महाराष्ट्राला राजवंशांची समृद्ध परंपरा

## श्रीनंद बापट : राजगुरुनगर येथे साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क



> इतिहास हा फक्त युद्ध, लढाई यापुरताच मर्यादित नसून त्याकडे समाज, संस्कृती, निसर्ग आणि माणसाचा विकास या दृष्टीने पाहावयास हवे. स्त्रियांनी यशस्वीपणे राज्यकारभार करण्याची परंपरा प्राचीन असून सातवाहनकालीन नागालिका आणि वाकाटककालीन प्रभावती गुप्त यांनी स्वत:च्या नावाने अत्यंत सक्षमपणे राज्यकारभार केला.
>
> -डॉ. श्रीनंद बापट

**राजगुरुनगर :** प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाला मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव अशी राजवंशांची दीर्घ परंपरा लाभली असून त्यांनी राज्यकारभाराबरोबर साहित्य, कला, शिल्प आणि सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्राला संपन्न केले असल्याचे प्रतिपादन पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचे निबंधक आणि इतिहास संशोधक डॉ. श्रीनंद बापट यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'प्राचीन महाराष्ट्र' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थेचे संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, ॲड. माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.


बापट म्हणाले, चालुक्यापासून चाळके व सोळंकी, राष्ट्रकूटवरून राठोड, परमारवरून पवार, शिलाहारवरून शेलार अशी राजवटींपासून आडनावे रुढ झाल्याचे ते म्हणाले. मंदिरे बांधण्याची स्वतंत्र परंपरा चालुक्य राजवटीत निर्माण झाल्याचे सांगताना कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर त्यांच्या काळात, तर पंढरपूरचे विठ्ठल मंदिर यादवकाळात बांधले गेल्याचे ते म्हणाले. १३व्या शतकात अल्लाउद्दीन खिलजीने यादवांच्या केलेल्या पराभवाबद्दल बोलताना त्यांनी राजा हा फक्त रसिक, धार्मिक, सामाजिक दृष्टीचा असून चालत नाही, तर तो अखंड सावध असावा लागतो. या सर्व राजांची समृद्ध परंपरा आपल्याला पुढे घेऊन जायची असेल, तर विद्यार्थ्यांनी अभ्यासू, सावध, काटेकोर आणि चौकस असायला हवे, असे त्यांनी सांगितले.

प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शिल्पा टाकळकर यांनी परिचय करुन दिला. श्रुतिका कोरडे हिने आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 9 Jan 30, 2020
Powered by: erelego.com

# प्राचीन महाराष्ट्राला राजवंशांची समृद्ध परंपरा : डॉ. श्रीनंद बापट

राजगुरुनगर, (वार्ताहर) : प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव अशी राजवंशांची दीर्घ परंपरा लाभली असून त्यांनी राज्यकारभाराबरोबर साहित्य, कला, शिल्प आणि सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्राला संपन्न केले असल्याचे प्रतिपादन भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचे निबंधक आणि इतिहास संशोधक डॉ. श्रीनंद बापट यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत प्राचीन महाराष्ट्र या विषयावर बोलत होते.



या प्रसंगी संस्थेचे संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, तसेच ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. श्रीनन्द बापट पुढे बोलताना म्हणाले की, इतिहास हा फक्त युद्ध, लढाई यापुरताच मर्यादित नसून त्याकडे समाज, संस्कृती, निसर्ग आणि माणसाचा विकास या दृष्टीने पाहावयास हवे. स्त्रियांनी यशस्वीपणे राज्यकारभार करण्याची परंपरा प्राचीन असून सातवाहनकालीन नागालिका आणि वाकाटककालीन प्रभावती गुप्त यांनी स्वतःच्या नावाने अत्यंत सक्षमपणे राज्यकारभार केल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्र हा दगडांचा देश असल्याने देशातील एकूण १६०० प्राचीन लेण्यांपैकी १२०० लेणी महाराष्ट्रात असून जगातील सर्वात मोठे मानवनिर्मित लेणे वेरूळचे कैलास लेणे असल्याचे त्यांनी सांगितले. चालुक्यापासून चाळके व सोळंकी, राष्ट्रकुटवरून राठोड, परमारवरून पवार, शिलाहारवरून शेलार अशी राजवटींपासून आडनावे रूढ झाल्याचे ते म्हणाले. मंदिरे बांधण्याची स्वतंत्र परंपरा चालुक्य राजवटीत निर्माण झाल्याचे सांगताना कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर त्यांच्या काळात तर पंढरपूरचे विठ्ठल मंदिर यादवकाळात बांधले गेल्याचे ते म्हणाले. तेराव्या शतकात अल्लाउद्दीन खिलजीने यादवांच्या केलेल्या पराभवाबद्दल बोलताना त्यांनी राजा हा फक्त रसिक, धार्मिक, सामाजिक दृष्टीचा असून चालत नाही तर तो अखंड सावध असावा लागतो. या सर्व राजांची समृध्द परंपरा आपल्याला पुढे घेऊन जायची असेल तर विद्यार्थ्यांनी अभ्यासू, सावध, काटेकोर, आणि चौकस असायला हवे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही.बी. दौंडकर केले. परिचय प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केला तर आभार श्रुतिका कोरडे या विद्यार्थीनीने मानले.

---

# प्राचीन महाराष्ट्राला राजवंशांची समृद्ध परंपरा



राजगुरूनगर : प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव अशी राजवंशांची दीर्घ परंपरा लाभली असून त्यांनी राज्यकारभाराबरोबर साहित्य, कला, शिल्प आणि सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्राला संपन्न केले असल्याचे प्रतिपादन पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचे निबंधक आणि इतिहास संशोधक डॉ. श्रीनन्द बापट यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत प्राचीन महाराष्ट्र या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी संस्थेचे संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड.माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा.एस. एन.टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.


डॉ. श्रीनन्द बापट पुढे बोलताना म्हणाले की, इतिहास हा फक्त युद्ध, लढाई यापुरताच मर्यादित नसून त्याकडे समाज, संस्कृती, निसर्ग आणि माणसाचा विकास या दृष्टीने पाहावयास हवे. स्त्रियांनी यशस्वीपणे राज्यकारभार करण्याची परंपरा प्राचीन असून सातवाहनकालीन नागालिका आणि वाकाटककालीन प्रभावती गुप्त यांनी स्वतःच्या नावाने अत्यंत सक्षमपणे राज्यकारभार केल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्र हा दगडांचा देश असल्याने देशातील एकूण १६०० प्राचीन लेण्यांपैकी १२०० लेणी महाराष्ट्रात असून जगातील सर्वात मोठं मानवनिर्मित लेणे वेरूळचे कैलास लेणे असल्याचे त्यांनी सांगितले. चालुक्यापासून चाळके व सोळंकी, राष्ट्रकुटवरून राठोड, परमारवरून पवार, शिलाहारवरून शेलार अशी राजवटींपासून आडनावे रूढ झाल्याचे ते म्हणाले. मंदिरे बांधण्याची स्वतंत्र परंपरा चालुक्य राजवटीत निर्माण झाल्याचे सांगताना कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर त्यांच्या काळात तर पंढरपूरचे विठ्ठल मंदिर यादवकाळात बांधले गेल्याचे ते म्हणाले.

सका

# सीमा भाग महाराष्ट्राचाच : बापट

राजगुरुनगर, ता. ३१ : ''इतिहास हा फक्त युद्धापुरताच मर्यादित नाही. त्याकडे समाज, संस्कृती, निसर्ग आणि माणसाचा विकास या दृष्टीने पाहावयास हवे. यादवकालीन महाराष्ट्राची सीमा हीच, आपण मागत असलेल्या संयुक्त महाराष्ट्राची सीमा आहे. त्यामुळे तो प्रदेश महाराष्ट्रातच येणे न्याय्य आहे,'' असे प्रतिपादन पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचे निबंधक आणि इतिहास संशोधक डॉ. श्रीनंद बापट यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'प्राचीन महाराष्ट्र' या विषयावर ते बोलत होते. डॉ. बापट म्हणाले, ''महाराष्ट्र



डॉ. बापट

हा कायम राज्यकर्त्यांचा प्रदेश राहिला असून प्राचीन महाराष्ट्राला मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव अशा राजवंशांची दीर्घ परंपरा लाभली आहे. त्यांनी राज्य कारभाराबरोबर साहित्य, कला, शिल्प आणि सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्राला संपन्न केले. स्त्रियांनी यशस्वीपणे राज्य कारभार करण्याचीही परंपरा प्राचीन महाराष्ट्राची असून सातवाहनकालीन नागालिका आणि वाकाटककालीन प्रभावती गुप्त यांनी स्वत:च्या नावाने अत्यंत सक्षमपणे राज्यकारभार केल्याचा इतिहास आहे.''

ते म्हणाले, ''महाराष्ट्र हा दगडांचा देश असल्याने देशातील १६०० प्राचीन लेण्यांपैकी १२०० महाराष्ट्रात आहेत. जगातील सर्वात मोठे मानवनिर्मित लेणे 'वेरूळचे कैलास लेणे' आहे. चालुक्यापासून चाळके व सोळंकी, राष्ट्रकुटवरून राठोड, परमारवरून पवार, शिलाहारवरून शेलार अशी राजवटींपासून आडनावे रूढ झाली आहेत. मंदिरे बांधण्याची स्वतंत्र परंपरा चालुक्य राजवटीत निर्माण झाली. कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर त्यांच्या काळात, तर पंढरपूरचे विठ्ठल मंदिर यादवकाळात बांधले गेले.''

प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शिल्पा टाकळकर यांनी परिचय करून दिला.

Pune, Distric
01/02/2020 Pa

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख